संक्षिप्त फौजदारी केस नं. ७७/२०२०
नि. क्र. १२ लगत

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – युसुफ अब्दुल्ला शेख,

**वय**– ३० वर्षे , **व्यवसाय** – चालक,

**राहणार**– मानगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१**. दिनांक ०१/०६/२०१९ रोजी मी मुंबईकडुन गोवाकडे आयशर टेम्पोने चालल्लो होतो. त्यावेळी माझ्यासोबत सिराज शहा व फिरोज याहु हे दोघे होते. संगमेश्वरच्या पुढे बावनदीच्या जवळ अपघात झाला होता. सदरचा अपघात आयशर टेम्पो व टाटा टेम्पो यांचा झाला होता. दोन्ही वाहनांचे क्रमांक मला आता आठवत नाही. कारण, त्यास ०६ ते ०७ वर्षे झाली आहेत.

**०२**. सदरचा आयशर टेम्पो मुंबईकडुन गोवाकडे चालला होता व टाटा टेम्पो हा गोवाकडुन मुंबईकडे चालला होता. मुंबईकडुन गोवाकडे येताना रस्त्याच्या उजव्या बाजुला सदरचा अपघात झाला होता. आम्ही सदर ठिकाणी गेलो त्यावेळी पोलीसांनी तेथील गाडया बाजुला काढल्या होत्या. सदर अपघातामुळे ०२ किलोमीटर अंतरापर्यंत वाहतुक कोंडी झाली होती. सदर अपघातामुळे दोन्ही वाहनांचे चालक जखमी झाले होते व दोन्ही वाहनांचे नुकसान झाले होते. सदर दोन्ही जखमींना दवाखान्यात नेण्यात आले होते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जी. आर. गानु यांच्याकडून –**

**०३**. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरुन गाडया बाजुला काढले असल्यामुळे नेमका अपघात कोणत्या ठिकाणी व कोणत्या बाजुला झाला होता, हे मला

आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सर्व मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास  नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.01.17 10:50:56 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. १६.०१.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of evidence | :- | 16/01/2026 |
| evidence signed by PO. on | :- | 16/01/2026 |
| evidence uploaded on | :- | 17/01/2026 |